-----------------------------------------------------------------------------------------------------------

**संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी , नाशिक**
**त्र्यंबक रोड, नाशिक- ४२२००७**
**जावक क्रमांक /आस्था ३/ मपोअ/ सरळसेवा भरती / २०१४/६५९६ दिनांक -२०/०८/२०१४**
**सरळसेवा भरती सन - २०१४**

*****************************************************************************************

**संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक** या कार्यालयातील कनिष्ठ श्रेणी लिपीक, निम्नश्रेणी लघुलेखक व **प्राचार्य , गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक** या कार्यालयातील कनिष्ठ श्रेणी लिपीक या संवर्गातील रिक्त पदे भरतीसाठी पात्र अर्हता-धारक उमेदवारांकडून स्वतंत्र कार्यालयान करीता विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच http://oasis.mkcl.org/mpanashik2014 या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**ऑनलाईन अर्ज दिनांक २६/०८/२०१४ ते १०/९/२०१४ पर्यत उपलब्ध असतील. प्रत्येक पदांसाठी व कार्यालयासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. एका वेळी एकाच कार्यालयाच्या परीक्षेस बसता येईल, याची नोंद घ्यावी.**

**<u>टिप -एका उमेदवाराने एका वेळी एकाच कार्यालयाकरीता फॉर्म भरावा अन्यथा दोन्ही कार्यालयाचे अर्ज रद्द ठरविण्यात येतील.</u>**

**भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गानिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार तसेच, भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.**

## १) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील रिक्त पदे :-

| अ.क्र | पद व वेतन श्रेणी | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | निम्नश्रेणी लघुलेखक<br>९३००-३४८०० /- + (ग्रेड पे रु.४३००) | खुला-१<br>इमाव-१ | १) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) अथवा महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणुन जाहीर केलेली अर्हता धारण करणे आवश्यक.<br>२) निम्नश्रेणी लघुलेखकनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मराठी किंवा इंग्रजी लघुलेखन १०० शब्द प्रति मिनीट हि अर्हता धारण करणे आवश्यक<br>३) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मराठी ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. |

**कनिष्ठ श्रेणी लिपीक (लिपीक टंकलेखक) - १८ रिक्त पदे**

**(वेतन श्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन बँड रु - ५२०० - २०२०० + पी.बी. ग्रेड वेतन रु. १९०० )**

| | | | समांतर आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| अ.क्र | रिक्त पदे | प्रवर्ग | भरावयाची एकुण पदे | अंशकालीन कर्मचारी १० % | महिला ३० % | खेडाळू ५ % | अपंग ३ % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भूकंपग्रस्त २ % | समांतर आरक्षण व्यतिरिक्त इतर पदे |
| १ | १८ | अ.जाती | ०० | | | | | | | | ०० |
| २ | | अ.जमाती | ०२ | | ०१ | | | | | | ०१ |
| ३ | | वि.जा. (अ) | ०१ | | | | | | | | ०१ |
| ४ | | भ.ज. (ब) | ०१ | | | | | | | | ०१ |
| ५ | | भ.ज. (क) | ०१ | | | | | | | | ०१ |
| ६ | | भ.ज. (ड) | ०० | | | | | | | | ०० |
| ७ | | इ. मा. व. | ०४ | | ०१ | | | ०१ | | | ०२ |
| ८ | | विमाप्र | ०१ | | | | | | | | ०१ |
| ९ | | वि.मा.प्र (अ) | ०१ | | | | | | | | ०१ |
| १० | | ई.एस.बी.सी. | ०१ | | | | | | | | ०१ |
| | | खुले | ०६ | ०१ | ०२ | | | ०१ | | | ०२ |
| | | एकुण | १८ | ०१ | ०४ | | | ०२ | | | ११ |

**(टिप - वि.मा.प्र. (अ) व ई.एस.बी.सी हा नवीन संवर्ग शा. नि. सा.प्र.वि. क्रमांक बीसीसी-२०१४/प्र.क्र २१६-ए / २०१४/ १६-ब दिनांक २४ जुलै २०१४ अन्वये समाविष्ट केल्याने आरक्षण संख्येत बदल होऊ शकतो. त्यानुसार सामाजिक संवर्गातील पदांमध्येही बदल होऊ शकतो. तसेच शासन स्तरावरुन मराठा आरक्षण व मुस्लिम आरक्षण याबद्दल मार्गदर्शन प्राप्त झाल्यास त्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षणात पुन्हा बदल करण्यात येईल. )**

## शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| १ | १) किमान अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ( एस. एस. सी.) उत्तीर्ण टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी कमीत कमी ३० शब्द प्रती मिनीट, किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनीट परीक्षा उत्तीर्ण असलेले शासन मान्य व्यावसायिक संस्थेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>२) संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा. प्र.वि. क्र प्रशिक्षण २०००/प्रकरण -६१/२००१/३९/, दिनांक १९/३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. |

## २) प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथील कार्यालयाची रिक्त पदे :-

**कनिष्ठ श्रेणी लिपीक (लिपीक टंकलेखक) - ०४ रिक्त पदे**

**(वेतन श्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन बँड रु - ५२०० - २०२०० + पी.बी. ग्रेड वेतन रु. १९०० )**

| | | | समांतर आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| अ.क्र | रिक्त पदे | प्रवर्ग | भरावयाची एकुण पदे | अंशकालीन कर्मचारी १० % | महिला ३० % | खेडाळू ५ % | अपंग ३ % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भूकंपग्रस्त २ % | समांतर आरक्षण व्यतिरिक्त इतर पदे |
| १ | ०४ | अ.जाती | ०१ | | | | | | | | ०१ |
| २ | | अ.जमाती | ०१ | | | | | | | | ०१ |
| ३ | | वि.जा. (अ) | ०० | | | | | | | | ०० |
| ४ | | भ.ज. (ब) | ०० | | | | | | | | ०० |
| ५ | | भ.ज. (क) | ०० | | | | | | | | ०० |
| ६ | | भ.ज. (ड) | ०० | | | | | | | | ०० |
| ७ | | इ. मा. व. | ०० | | | | | | | | ०० |
| ८ | | विमाप्र | ०० | | | | | | | | ०० |
| ९ | | वि.मा.प्र (अ) | ०० | | | | | | | | ०० |
| १० | | ई.एस.बी.सी. | ०० | | | | | | | | ०० |
| | | खुले | ०२ | | ०१ | | | | | | ०१ |
| | | एकुण | ०४ | | ०१ | | | | | | ०३ |

## शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| १ | १) किमान अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ( एस. एस. सी.) उत्तीर्ण टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी कमीत कमी ३० शब्द प्रती मिनीट, किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनीट परीक्षा उत्तीर्ण असलेले शासन मान्य व्यावसायिक संस्थेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>२) संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा. प्र.वि. क्र प्रशिक्षण २०००/प्रकरण -६१/२००१/३९/, दिनांक १९/३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. |

## १ परीक्षेचे स्वरुप :-

१.१ संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक व प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक कार्यालयाची कनिष्ठ श्रेणी लिपीक (लिपीक टंकलेखक) /निन्मश्रेणी लघुलेखक संवर्गातील पात्र उमेदवारांना शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ नुसार परिक्षेचा दर्जा कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी ) आहे. अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

१.२ संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक व प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक कार्यालयाची स्वतंत्र निवडसुची ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे एकाच कार्यालयाच्या परीक्षेत उपस्थित राहता येईल याची नोंद घ्यावी. उमेदवाराची निवड प्रक्रिया दोन्ही कार्यालयाकडून स्वतंत्रपणे करण्यांत येणार आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया गुणवत्तेच्या आधारावर स्वतंत्र राहील. याबाबतचे सर्व अधिकार संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहतील.

१.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिम १२१४/प्र.क्र (४३/१४)१३ -अ, दिनांक ५ जून २०१४ अन्वये मौखिक परीक्षा घेण्यात येणार नाही. फक्त लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे (मेरिट यादी) गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१.४ **वरील सर्व संवर्गातील उमेदवारांची विषयांची परीक्षा व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक व प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक कार्यालयाची परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. परिक्षेची नियोजीत ठिकाण, तारीख, वेळ आपणास** http://oasis.mkcl.org/mpanashik2014 **च्या वेबसाईटवरच पाहण्यास मिळेल. वेबसाईटवर वेळोवेळी भेट देण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.**

## २ वयोमर्यादा :-

२.१ खुल्या प्रवर्गासाठी उच्चतम वयोमर्यादा ३३ वर्ष राहील

२.२ जाहिरातीत नमुद केलेल्या प्रत्येक पदाची किमान वयोमर्यादा १८ वर्ष पुर्ण व कमाल वयोमर्यादा दिनांक २६ /०८/२०१४ रोजी गणली जाईल.

## ३ विहित वयोमर्यादा शिथिल करणे :-

३.१ दिनांक १ नोव्हेंबर, २००३ च्या शासन निर्णयाप्रमाणे अगोदरच शासन सेवेत असलेल्यांना नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी वयोमर्यादा कमाल वयोमर्यादा अधिक अनुभवाचा कालावधी इतपत किंवा पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५० वर्षोपर्यत शिथिलक्षम राहील.

३.२ आरक्षणाचा लाभ घेणा-या मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे राहील.

३.३ समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (दिनांक १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ या वित्तीय वर्षासाठी निर्गमित झालेले) असलेल्या विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (अ) , भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) , भटक्या जमाती (ड) व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी विहित कमाल वयोमर्यादा २.१ मध्ये नमुद केल्यापेक्षा पाच (०५) वर्ष शिथिलक्षम राहील. त्यापुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

३.४ शासन निर्णयातील तरतुदीनुसार खेळाडूकरीता राखीव असलेल्या पदांसाठी खेळाडुंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादा २.१ मध्ये नमुद केल्यापेक्षा ५ वर्षोपर्यत शिथिलक्षम राहील.

३.५ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांना वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील.

३.६ माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील.

३.७ अंशकालीन उमेदवारांसाठी वयोमर्यादा वयाच्या ४६ वर्षोपर्यत शिथिलक्षम राहील.

## ४ महिलांसाठी आरक्षण :-

४.१ महिलांसाठी असलेले समांतर आरक्षण शासन निर्णय , महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/ २००१ / मसेसआ २०००/ प्र.क्र ४१५/ का-२/ २५ मे २००१ आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.२ खूल्या संवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमी लेअर ) महिला सदस्यांना महिलांसाठी आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

४.३ खूल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खूल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअर प्रवर्गातील नसल्याचे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे व उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट (क्रिमीलेअर ) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर ) सादर करणे आवश्यक आहे. ( दिनांक १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ या वित्तीय वर्षासाठी निर्गमित झालेले)

## ५ माजी सैनिकांसाठी आरक्षण :-

५.१ माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. माजी सैनिक उमेदवारांना शासन निर्णयानुसार देय असलेल्या शैक्षणिक अर्हता, उच्चतम वयोमर्यादा इत्यादी सवलती देण्यात येतील.

५.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीए १०९० /६/ प्र.क्र /२२२/ ९१/ २८ दिनांक ३० डिसेंबर १९९१ नुसार माजी सैनिकांनी लष्करातील सेवेनंतर नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणा-या सवलतीचा एकदा फायदा घेऊन त्यांचा नागरी सेवेतील पदावर नेमणूक झाली असल्यास पून्हा त्यांना नागरी सेवेतील पदांसाठी माजी सैनिक म्हणुन दुस-यांदा फायदा घेता येणार नाही. परंतु ज्या माजी सैनिकांना खाजगी / स्वायत्त संस्था / सार्वजनिक उपक्रम / शासकीय सेवा यामध्ये रोजंदारी कंत्राट पध्दती / तात्पुरत्या तदर्थ स्वरुपाच्या नेमणुका मिळाल्या असतील आणि त्यांना सेवेतून

कोणत्याही क्षणी काढून टाकण्याची शक्यता असेल, अशा प्रकरणात हे आदेश लागू राहणार नाहीत.

५.३ **समांतर आरक्षणातील उमेदवार, महिला उमेदवार, खेळाडु, माजी सैनिक, अंशकालीन कर्मचारी, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, इत्यादी प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून पदे भरण्यात येतील.**

## ६.१ अंशकालीन उमेदवारांना आरक्षण :-

६.२ अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. इ.एसपी. १४७८/३४९३/आयएनडी १३ दिनांक ३०/११/१९७८ मधील तरतुदीनुसार सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षोपर्यत दरमहा मानधनावर काम केलेले असणे आवश्यक आहे. सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असणे आवश्यक आहे. अशा मानधनावर काम केलेल्या अशंकालीन पदवीधर / पदविधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयात नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायाजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## ७ मागासवर्गीयांचे आरक्षण :-

७.१ समांतर आरक्षणातील पुष्टयार्थ महाराष्ट्र अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्रदान करण्यात आलेल्या जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

वि.जा. (अ), भ.ज. (ब) , भ.ज.(क) , भ.ज.( ड) , वि.मा.प्र. , आणि इ.मा.व , विशेष मागास प्रवर्ग अ ( मुस्लीम धर्म) , शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्ग (मराठा समाज) या मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१/०३/२०१४ नंतरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीनंतर ६ महिन्याचे आत उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच खुला गटातील महिला, अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुंचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ( १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ ) या वित्तीय वर्षासाठी निर्गमित झालेले ची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा उमेदवारांचा उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचा दावा ग्राहय धरला जाणार नाही.

७.२ सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्त जाती अ , भटक्या जमाती ( ब,क,ड) प्रवर्गासाठी विहित आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

७.३ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-यांने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste

Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रती निवडअंती सादर करणे आवश्यक आहे.

७.४ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी -२०११ प्र.क्र- १०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून , तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याचा दिनांकापासून ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्व लक्षीप्रभावाने रदद करणेत येईल.

७.५ महाराष्ट्र शासनाचा अध्यादेश क्र १४ दिनांक ९ जुलै २०१४ व सा.प्र.वि. शा.नि. क्र बीसीसी -२०१४/प्र.क्र २१६/१६-ब, दिनांक २४ जुलै २०१४ नुसार विशेष मागास प्रवर्ग अ(एस.बी.सी.ए) करीता सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार ५टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. या जागांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांस अल्पसंख्याक विकास विभाग शा. नि. क्र. अविवि २०१४/ प्र.क्र ८१/का-७/ दिनांक १९ जुलै २०१४ मध्ये नमूद केलेल्या अटीनुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र राहील.

७.६ राज्यात विशेष मागास प्रवर्ग (अ) या प्रवर्गातील मुस्लिम समाजास जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र शा.नि.सा.न्या.व वि.स.वि. क्रमांक सीबीसी -१०/२०१४/प्र.क्र १३१/मावक दिनांक २२ जुलै २०१४ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

## ८ लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र :-

८.१ शासनाने शासकीय विभागातील गट अ ब क आणि ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र विहित करणारे महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र नियम २००५ , दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेव्दारे पारीत केले आहे. या नियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील पदांसाठी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवारास शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र ( Disqualified) ठरविण्यात येईल.

## ९ इतर सुचना :-

९.१ जाहिरातीत दर्शविल्या प्रमाणे त्या त्या पदास वेतनसंरचनेतील वेतन बॅडमध्ये वेतन अधिक ग्रेड वेतन यांसह त्यावर शासन नियमानुसार वेळोवेळी अस्तित्वात असलेला महागाई भत्ता व इतर भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

९.२ सध्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत शिफारशिसह सादर करणे आवश्यक आहे.

९.३ दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या परिपत्रक क्रं. अंनियो

/१००५ १२६/ सेवा ४/ दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना नियम लागू राहील.

९.४ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

९.५ उमेदवारांना लेखी परीक्षा करीता स्वखर्चाने यावे लागेल.सदर कालावधीत एखादी दूर्घटना झाली यास कार्यालया जबाबदार राहणार नाही.

९.६ लेखी परीक्षा नाशिक शहरातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर घेणेत येईल.

९.७ एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

९.८ उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

९.९ एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रनिमं २००७/प्र.क्र ४६/०७/१३५अ/ दिनांक २७/६/२००८ मधील निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

९.१० सदर भरती माहे ३०/१०/२०१५ अखेर रिक्त होणा-या पदांच्या अनुषंगाने असल्यामुळे पात्र झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी रिक्त होणा-या पदांच्या अनुषंगाने नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**९.११ कश्रेलि. पदातील निवड होणा-या उमेदवार मुफसल केडर मध्ये नेमणूक राहील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

९.१२ महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक कार्यालयाच्या यापुर्वीच्या सरळसेवा भरती सदर्भाच्या सर्व जाहिराती व उमेदवारांनी नोकरीसाठी केलेले विनंती अर्ज रदद करण्यात येत आहेत.

**९.१३ निम्नश्रेणी लघुलेखक व कनिष्ठ श्रेणी लिपीक ही पदे मुफूसल कॅडरची आहेत. त्यामुळे विहीत नेमणूक कालावधी पुर्ण झाल्यानंतर नियमानुसार बदलीपात्र ठरतील.**

## १० अंतिम निवड यादी मधील उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे :-

१०.१ पदवीधर अंशकाली, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्रधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ शासन निर्णय महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्रमांक ८२/ मसेआ -२०००/प्र.क्र ४१५/का. २ दिनांक २५/५/२००१ अन्वये खुला महिला, वि.जा. अ. भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, विमा.प्र. व इ.मा. व या प्रवर्गातील महिला उमेदवारांची राखीव व बिनराखीव पदांसाठी निवड झाल्यास उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये नसल्याबाबतचे सक्षम

अधिकारी यांचे दिनांक ३१/०३/२००१४ या दिनांकापर्यत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१०.३ सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र एस आर व्ही २०००/प्र.क्र १७/२०१०/१२ दिनांक २८/३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -२०००/प्र.क्र १७/२०००/१२ दिनांक १/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ अन्वये दिनांक २८/३/२००५ नूसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्याबाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे, तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०.४ शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला, (Domicite Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र , अ.ज./अ.जा.उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Cremy-layer Certificate) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षंकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक, व याबाबत प्राधिकृत केलेले व सक्षम अधिका-यांनीच प्रमाणित केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास आपली निवड रद्द समजणेत येईल.

१०.५ उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१०.६ अंतिम निवड यादीमधील उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

१०.७ उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवारांची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवड यादी तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

१०.८ अंतिम निवड यादी / प्रतिक्षायादीतील पात्र उमेदवारांनी शासकीय सेवेत रुजु होण्यापूर्वी किमान ३ वर्षे सेवेत राहण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०.९ उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतिम यादी प्रसिध्द करुन

उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

## ११ ऑनलाईन अर्ज सादर करावयाची कार्यपध्दती व इतर सुचनाः -

११.१ जाहिरात काळजी पुर्वक वाचावी.

११.२ ऑनलाईन अर्ज http://oasis.mkcl.org/mpanashik2014 या संकेत स्थळावर उपलब्ध राहिल.

११.३ ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदांची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.

११.४ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वतःजवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो, सही स्कॅन करुन अपलोड करावी.

११.५ ऑनलाईन अर्ज करणेसाठी उपरोक्त संकेत स्थळावर Apply Online या लिंक (Link) वर क्लिक करुन अर्ज भरणेस सुरुवात करावी.

११.६ ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद व कार्यालय निवड, एक-एक करत आपणांस ऑनलाईन विचारालेल्या प्रश्नांचे उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

११.७ ऑनलाईन अर्ज उमेदवारांना अचुक भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील त्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

११.८ आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉगन (Login) आयडी (ID) आणि पासवर्ड (Password) निर्माण करुन तुम्हाला तूमच्या स्क्रिनवर दाखवेल. आणि तुम्ही पुरविलेला भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस (SMS) करेल**. ( कृपया आपला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक अचुक टाकावा)** तुमचा लॉगन इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल याची नोद घ्यावी.

११.९ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे / कौशल्य विकास या कार्यालयास व आदिवासी विकास विभागाकडे नाव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी रितसर ऑनलाईन अर्ज http://oasis.mkcl.org/mpanashik2014 करणे

११.१० उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई - मेल आयडी नमुद करावा जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

## १२. अर्जाचे वेळापत्रक :-

**ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी आल्यास MKCL च्या 9326552525 दुरध्वनी वर संपर्क साधावा.**

| अ.क्र | तपशील | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यत |
| १ | MKCL च्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि.26/8/2014 | दि.10/9/2014 |
| | बँकेत विहीत चलनाव्दारे परीक्षाशुल्क जमा करण्याचा कालावधी | दि.27/8/2014 | दि.12/9/2014 |
| ३ | बँकेत शुल्क भरल्यानंतर विस्तुत ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि.15/9/2014 | |
| २ | १) परिक्षा शुल्क - ५००/- (अक्षरी पाचशे रुपये मात्र )<br>२) मागास प्रवर्ग - ३००/- ( अक्षरी तीनशे रुपये मात्र)<br>३) माजी सैनिक - परीक्षा शुल्क लागु नाही.<br>( वर दर्शविण्यांत आलेले परीक्षाशुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वागळून आहे.) | | |

**लेखी परीक्षेचा कार्यक्रम MKCL च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

| | |
|---|---|
| | माहिती भरल्यानंतर उमेदवाराचे अर्जाची प्रिंट स्वत: काढावी किंवा MKCL च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रातुन काढून दिली जाईल. ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईटसला भेट द्यावी. जेणे करुन परीक्षेचे नियोजीत तारीख आपणास समजु शकेल.ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे किंवा MKCL ला पाठविण्याची आवश्यकता नाही. |
| | पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबत माहिती MKCL च्या अधिकृत वेबसाईवर उपलब्ध राहील. |
| | ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्यांच्या लॉगन आयडीव्दारे MKCL च्या वरील नमुद संकेत स्थळावरुन डाऊनलोड करता येईल. किंवा MKCL च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावरुन प्राप्त करुन घेता येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |

स्वाक्षरीत
संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक